अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# सावरकरांच्या त्यागामुळे स्वातंत्र्य जवळ आले

देशाचा भविष्यकाळ आज ज्यांच्यामुळे सुरक्षित आहे अशा थोर क्रांतिकारक आणि देशभक्तांचा त्याग त्यासाठी कारणीभूत ठरतो. अनेक प्रकारच्या हालअपेष्टा सहन करून ज्यांनी केवळ देशसेवा हेच जीवनकार्य मानले अशा शेकडो नव्हे तर हजारो हुतात्म्तांनीसुध्दा भारताला फार मोठे वैभव प्राप्त करून दिले. अशा महत्त्वाच्या क्रांतिकारकांमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव अग्रक्रमाने येते. आज त्यांचे स्मरण करीत असताना त्यांनी भोगलेला त्याग आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरतो. अंदमानमध्ये सावरकरांना झालेली ५० वर्षांची शिक्षा किंवा भारत स्वतंत्र झाल्यानंतरही त्यांच्या वाट्याला आलेल्या हालअपेष्टा आजही अंगावर रोमांच उभे करतात. सावरकर हे नुसते देशभक्त नव्हते तर उत्कृष्ट लेखक कवी नाटककार पत्रकार इतिहासाचे तज्ज्ञ आणि अत्यंत उत्कृष्ट वक्ते होते.

लहानपणीच त्यांनी केलेली प्रतिज्ञा एका कठोर तपश्चार्येची सुरुवात होती. मारता मारता मरे तो झुंजे अशा शब्दांमध्ये त्यांनी आपल्या देशकार्याचा श्रीगणेशा केला होता. इंग्रज हे आपल्याला बऱ्या बोलाने स्वातंत्र्य देणार नाहीत. त्यांच्याशी लढाच द्यावा लागेल, गोड बोलून आंदोलन करून किंवा अर्ज विनंत्या करून इंग्रज दाद देणार नाहीत. कारण ते एक जगातील बलाढय राष्ट्र आहे. अत्याधुनिक शस्त्रसामुग्री आणि एकेकाळी जगाच्या अनेक देशांवर राज्य करण्याचे काम इंग्रजांनी केले होते. अशा बलाढ्य शासकांची जुलमी सत्ता उलथवून टाकायची असेल तर सशस्त्र क्रांतीशिवाय पर्याय उरत नाही.

सावरकरांना याची आपल्या तरुणपणीच जाणीव झाली आणि त्यादिशेने आपल्या भावी जीवनाची आखणीही केली. जगाच्या अनेक देशाम ध्ये झालेले उठाव, अनेक देशामध्ये झालेल्या क्रांतिकारक चळवळी ज्यांचा त्यांनी अभ्यास केला. मॅझिनीसारख्या योध्द्याचे जीवनचरित्र त्यांनी अतिशय मनापासून वाचून काढले आणि त्यातून भारतातल्या क्रांतीला प्रेरणा देता येईल अशा पध्दतीची पुस्तकेही दिली. १८५७ चे स्वातंत्र्य समर हे केवळ साधे पुस्तक नसून तो भारताच्या क्रांती चळवळीचा इतिहास ठरतो. एवढेच नव्हे तर पुढच्या अनेक क्रांतिकारकांच्या मनात देशप्रेम ाची ज्वाला निर्माण करणारे स्फुलिंग ठरते. अशा पुस्तकाने सावरकरांनी हिंदुस्थानच्या तरुणांमध्ये राष्ट्रप्रेमाचे यज्ञकुंड पेटविण्याचा प्रयत्न केला म्हणून सावरकर हे यासाठीच आद्यक्रांतिकारक ठरतात.

## अमोघ वक्तृत्व आणि कर्तृत्व

आज देखील सावरकरांची अनेक पुस्तके इतिहासाचे वस्तुनिष्ठ दर्शन घडवितात. त्यांच्या नाटकामधून कवितांमधून देशभक्तिचा अंगार अनुभवता येतो. 'जयोस्तु ते भगवते महन्मंगले शुभास्पदे' या सारख्या काव्य रचनेमधून हा देश म्हणजे आपली भारतमाता आहे. तिच्या स्वातंत्र्यासाठी तिच्याच सुपुत्रांनी बलिदान केले पाहिजे आणि क्रांतीच्या ज्वाला निर्माण करून इंग्रजांना सळोकीपळो करून सोडले पाहिजे हाच त्यांचा प्रमुख उद्देश होता. आपल्या देशाची आपल्याला चांगली सेवा करता आली आणि इंग्रजांशी दोन हात करताना आपण कुठेही कमी पडू नये याची त्यांनी विशेष काळजी घेतली. इग्लंडला जाऊन बॅरिस्टर ही पदवी मिळवली. त्यांना ही पदवी मिळवून मोठया पगाराची नोकरी सहजपणे मिळाली असती.

परंतु त्यांनी ती स्वीकारली नाही. आपल्या कुटुंबाची वाताहत होत असूनही त्यांनी प्रपंचापेक्षा देशकार्याला अधिक महत्त्व दिले आणि म्हणूनच 'न घेतले व्रत हे आम्ही अंधतेने' अशा प्रकारची काव्य रचना करून ती देशसेवा आम्ही समजून उमजून किंवा जाणूवपूर्वक स्वीकारली आहे. यासाठी आम्हा चारही भांवडांना देशसेवेसाठी बलिदान करावे लागले तरी आमची तयारी आहे अशा प्रकारचा त्याग सावरकर यांनी केला होता. आज त्यांच्या या जीवनकार्याचे स्मरण करताना सावरकर नसते तर काय झाले असते असा विचार मनात डोकावल्याशिवाय राहत नाही. सावरकर होते म्हणून देशाचे स्वातंत्र्य ५० वर्षे लवकर मिळू शकले आणि आज स्वतंत्र भारतामध्ये प्रत्येकाचा देशाभिमान किती प्रखर असला पाहिजे याचे कायमचे आदर्श उदाहरण त्यांनी पुढच्या पिढीला घालून दिले.

## त्यागाची किंमत नाही

भारताला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली आहेत. आजची नवी पिढी अमर्याद स्वातंत्र्य आणि सुखाचा उपभोग घेत आहे. आजचे सत्ताधारी राजकारणी स्वत:चा स्वार्थ साधून घेण्यात मश्गूल आहेत. परंतु सावरकरांसारख्या अनेक क्रांतिकारकांच्या बलिदानाने आपल्याला ही सत्ता प्राप्त झाली किंवा स्वातंत्र्य उपभोगाला मिळाले याची जेवढी जाणीव ठेवायला पाहिजे तेवढी दिसत नाही. क्रांतिकारकांचे हुतात्म्यांचे केवळ स्मरण केले जाते पण त्यांनी केलेल्या त्यागाप्रमाणे देशाच्या संपत्तीचा सांभाळ करावा, देशामध्ये सर्वसामान्य माणसाच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात, त्याचे जीवनमान सुधारावे असे आजच्या सत्ताधाऱ्यांना मनापासून वाटत नाही. स्वातंत्र्यानंतरही देशातील ४० टक्के जनता दरिद्र्यात राहते. बेकारी, बेरोजगारी, उपासम ारी या समस्या अजूनही कायम आहेत यावरून भारताच्या सत्ताधाऱ्यांनी या स्वातंत्र्यवीरांच्या स्वप्नाला किंमत दिली नाही असेच सिध्द होते.

आज त्यांच्या या कर्तृत्वाची आठवण ठेवून देशाच्या कारभाराची धोरणे ठरवली गेली पाहिजेत. जग कितीही पुढे गेले, विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी इतिहास हाच देशाचे अस्तित्व टिकवत असतो आणि भविष्याला आकार देत असतो. म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी या देशाच्या पराक्रमी इतिहासाचे वारंवार वर्णन केले. आणि समाजातला पुरुषार्थ टिकवण्याचा प्रयत्न केला. त्यांची अनेक पुस्तके ही त्याची साक्ष देतात. आज त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांना आमचे विनम्र अभिवादन!